# घराणे जयपूर : काही वैशिष्ट्ये

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - दैनिक महाराष्ट्र टाईम्स, संपादक द्वा. भ. कर्णिक, मुंबई, ११ नोव्हेंबर, १९६७)

ग्वाल्हेर घराण्याने निर्माण केलेल्या अभिरुचिविषयक परिस्थितीत जे काही खटकणारे होते, त्याला उतारा घेण्याचे कार्य जयपूर व आग्रा या दोन्ही घराण्यांनी केले. ही दोन्ही घराणी प्रतिक्रियात्मक घराणी आहेत असा वरील विधानाचा अर्थ नाही हे सहज लक्षात घेईल. अर्थ इतकाच की महाराष्ट्रात ग्वाल्हेर गायकीचे संवर्धन होत असता अंतिम संगीतसिद्धीच्या दृष्टीने, एकंदर संगीतविकासाच्या दृष्टीने प्रतिकूल असणाऱ्या काही गोष्टी संगीतव्यवहारात शिरल्या, व ज्याप्रमाणे शरीरात बाहेरची गोष्ट शिरल्यास तिला बाहेर फेकण्याकडे शरीराची प्रवृत्ती असते, त्याचप्रमाणे कोणत्याही जिवंत कलाजाणीवेचेही असल्याने ग्वाल्हेरमधून उद्भवलेल्या या गोष्टींना उतारा देण्यासाठी संगीतप्रवृत्तींनी खटपट केली. या प्रवृत्तीचे दोन प्रमुख आविष्कार म्हणजे वर उल्लेखिलेले दोन संगीतविषयक दृष्टिकोण जयपूर व आग्रा.

जयपूर दृष्टिकोणाचा विचार प्रथम करू. जयपूरची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील -

१) अप्रचलित राग

२) विलंबित लय

३) गुंतागुंतीची गायकी

प्रचलिताच्या तोच-तोपणास कंटाळून जयपूरने मुख्यतः अप्रचलित राग गाण्याचे धोरण ठेवले. प्रचलितात गायकाच्या बाजूने तोच-तोपणा येतो त्याचप्रमाणे श्रोत्यालाही 'यानंतर काय?' हे माहीत असल्याने श्रवणदक्षता बाळगण्याची जरूर भासत नाही. श्रोता सावधचित्त व्हावा यासाठीही जयपूरने हा मार्ग स्वीकारला असण्याची शक्यता आहे. आणि या संदर्भातच पाहता अप्रचलिताची युक्ती सफल झाली असावी असे वाटते. गोविंदराव टेंब्यांनी भास्करबुवांच्या एका गाण्याची आठवण सांगताना भास्करबुवांनी देसी गावयास सुरुवात करताच हा राग कोणता या प्रश्नाने मंडळी प्रत्येक स्वर न् स्वर तपासू लागली या तऱ्हेचा उल्लेख केला आहे. ही गोष्ट स्वाभाविक वाटते. अप्रचलिताचे परिचितांच्या साहाय्याने विश्लेषण करून प्रचलितांप्रमाणे त्याला आपले करावयाचे ही सर्वसाधारण प्रवृत्ती, श्रोता हा विचक्षणा व दक्षता यांचा आदर्श बनावा, त्याची संवेदनशीलता वाढावी याच अपेक्षेची द्योतक आहे, व या दृष्टीने पाहता जयपूरने श्रोत्यांच्या अभिरुचीवर घडविलेला परिणाम हा स्वागतार्ह म्हटला पाहिजे.

### अप्रचलित राग

जयपूर गायकीच्या संदर्भात पाहता विलंबित लय हे वैशिष्ट्य अप्रचलित राग गाण्याच्या पहिल्या वैशिष्ट्यातूनच उदय पावते. राग अप्रचलित याचा दुसरा अर्थ तो एकाहून अधिक रागांचे मिश्रण असतो. अर्थातच असा राग स्थापन करणे, त्यात डोकावणाऱ्या इतर रागाचे माफक सूचन करणे, सर्वांची मिळून एक सलग आकृती करणे ही गोष्टच मुळी अधिक गुंतागुंतीची बनते. ग्वाल्हेरची मध्यलय वापरणे जयपूरला परवडण्यासारखे नव्हते. यामुळे आलापी अधिक संथ झाली व एकंदर गानक्रिया विस्तृत व तपशीलवार झाली. दक्षतेने ऐकण्याबरोबरच राग साकल्याने पाहणे हेही श्रोत्यांना शक्य झाले ते यामुळे. राग म्हणजे आकर्षक स्वरपुंज असे स्वरूप न राहता प्रत्येक ठिपका महत्त्वाचा असलेली एक रांगोळी झाली.

परंतु जयपूरचा परिणामही काही सर्वतः व सर्वकाळ स्वागतार्ह उरला नाही. याला कारण अर्थात जयपूरचे गायकच आहेत. प्रचलितापेक्षा अप्रचलितावर भर द्यावयाचा याचा अर्थ नेहमीच अप्रचलित गावयाचे असा थोडाच होतो? पण एकांतिकपणाचा दोष जवळ जवळ सगळ्याच घराण्यांच्या पदरी बांधावा लागतो. कोणताही धर्म जेव्हा स्थापन केला जातो तेव्हा वाईट नसतो, पण काल उदय पावलेला धर्म आज गढूळ होऊ लागतो हे सत्य आहे. तसाच प्रकार घराण्यांचा. न्याय्य व आवश्यक वेगळेपणा घेऊन ही घराणी जन्माला आली व आपला संसार थाटू लागली, पण असे करताना ज्या प्रवृत्ती व प्रेरणा मूलभूत समजल्या गेल्या त्यांचा अगदी तर्कदुष्ट पाठपुरावा करीत राहिल्यास सगळा खटाटोपच मुळी अर्थशून्य होतो हे त्यांनी लक्षात घेतले नाही. जयपूरवाल्यांनी सदा नटाचे प्रकार गाऊ लागावे. त्यातही आलापी करताना सुरुवातीपासून सहजगम्य, राग सहजपणे स्थापणाऱ्या बाळबोध आकृतींचा वापर कटाक्षाने टाळावा, हे कशासाठी? (अर्थात यास अपवाद आहेत, पण हे अपवाद जयपूरची एकंदर प्रवृत्ती थोडीशी मुरडल्यानेच शक्य होतात हे नजरेआड करून चालणार नाही.) अप्रचलित रागच सारखे गायले जातात, एवढेच नव्हे तर अनेकदा प्रचलितांचे स्वरूपही बुद्ध्याच बदललेले दिसते! प्रचलिताचा उपयोग सामान्यतः आधारभूत फूटपट्टीसारखा होत असतो. त्याच्या साहाय्याने इतर रागचौकटीही मापल्या जातात. प्रचलित चौकटीही अशा उगाच बदलल्या तर काय होते? श्रोत्याला पायाखालून जमीन सरकल्यासारखे वाटते. त्याच्या पायाखालची जमीन सरकल्यास त्याच्याशी संपर्क साधणे अवघड होते व परिणामतः कलाविष्कार हा कलाजाणीवेच्या संक्रमणापर्यंत जाऊ शकत नाही, हे लक्षात घ्यावयास नको काय?

जयपूरवाले प्रचलित राग गाऊ शकत नाहीत असे नव्हे. पण गात नाहीत आणि महाराष्ट्रात आज अप्रचलित रागांचे जे खळे पसरले आहे त्याला हे घराणे बरेचसे जबाबदार आहे. प्रभावी गायकीचे व प्रकाश पाडणारे कलावंत या घराण्यात निर्माण झाले, पण मूलतः जो तंत्राचा भाग होता तो त्यांच्याच आग्रहीपणामुळे मंत्र होऊन बसला. मालकंस न गाता संपूर्ण मालकंस गाणे यातच धन्यता मानण्याची प्रवृत्ती जयपूरनेच मुख्यतः वाढीस लावली. यामुळे खरी विद्वत्ता व गायनिक श्रेष्ठता याविषयी भ्रामक समजुती महाराष्ट्रात पसरल्या. चित्तापेक्षा चित्ताची चौकट महत्त्वाची वाटू लागली. गायकी आगळी असण्यापेक्षा रागाची चौकट वेगळी असणे मानाचे भासू लागले. तत्त्वावरून तपशीलावर लक्ष आले व तिथेच खिळून राहिले. यात संगीताभिरुचीचे पाऊल थोडे मागे सरकले, हे नि:संशय.

**गुंतागुंतीची गायकी**

संगीताभिरुचीच्या दृष्टीने दुसरा एक घातक परिणाम जयपूरमुळे झाला तो गुंतागुंतीच्या गायकीच्या बाबतीत. गुंतागुंतीतही आनंद असतो असे जयपूरचे मूलविधान न राहता गुंतागुंतीतच आनंद असतो अशा स्वरूपाचे झाले. अवघड गाणे, मुष्किल गाणे म्हणजेच 'गाणे' असे समीकरण झाले. आपले गाणे कमी गुंतागुंतीचे केले असते तर जयपूर हे जयपूर राहिलेच नसते असाही मुद्दा उपस्थित केला जाई. पण यात एक गैरसमज आहे. आक्षेप आहे तो जयपूरच्या वेगळेपणावर नाही. सरसकट गुंतागुंतीच्या आकृत्या विणण्यात रागाची सर्जनकेंद्रेसुद्धा गुदमरली जातात असा आक्षेप आहे. आपल्या पद्धतीनुसार गुंतागुंतीची गायकी सादर करण्याच्या भरात अनेकदा रागाचे स्वतंत्र असे रचनावैशिष्ट्य असते हे सत्य विसरून कसे चालेल? जयपूरचे सर्व राग सारखे वाटतात ते या सत्याकडे दुर्लक्ष केल्यामुळेच. रागांना स्वतःचे असे स्वरूपविशेष असतात. त्यानुसार त्याचे चलन, त्याची मोडणी बदलते असे लक्षात न घेता जयपूर आपल्या एकंदर पद्धतीच्या चौकटीत सर्व रागांना सारख्याच सहजपणे बसवायला पाहते आणि मग रागांचे सैनिकीकरण होऊ लागते. सर्वांना गणवेष दिल्यावर त्यांच्या नाकडोळ्यांचे, चेहऱ्यामोहऱ्यांचे स्वतंत्र अस्तित्त्व पुसले जाते, सर्व सैनिक सारखे वाटतात, तसा प्रकार होतो.

आणि यामुळे अवघड ते चांगले असा गैरसमज महाराष्ट्रात प्रसृत झाला आहे. गळ्याची कसरत, रचनेत गुंतागुंत यात फसून सरळ रेषेचे सौंदर्य महाराष्ट्र निदान गायनाच्या बाबतीत विसरू लागला आहे.

आणि या गुंतागुंतीचा आग्रह अत्यंत कर्मठ कडवेपणे धरणे हाही एक जयपूरविशेष आहेच. गाता गाता एखाद्या स्वरावर मजा घेत राहिले (अनेकदा कल्पना नसता अकल्पनीय ठिकाणी गाताना मजा येऊ लागते) असे जयपूरवाल्यांच्या बाबतीत कधीही होणार नाही. कमावलेले आवाज, स्वराच्या स्थानांचे निश्चित व पक्के ज्ञान या गोष्टी जवळ असूनही शिस्तीचे, पद्धतीचे गिलोटीन स्वराला लावल्याखेरीज हे राहत नाहीत. आणि हे सारे परंपरा, गायकीचे इमान यांच्या नावाखाली होत असल्याने चांगलाच घोटाळा होतो. उच्चांक जसे मोडण्याकरिता असतात त्याचप्रमाणे शिस्त, परंपरा या गोष्टींचे असते. या परंपरांना जीवेभावे चिकटून बसण्यात परंपरांच्या अंगभूत समावेशनक्षमतेचा अपमानच होतो. यांत्रिक व कर्मठ बनल्यास परंपरा ही रूढी बनते, व रूढी होताच कलाव्यापाराच्या प्रवाहास अडथळे निर्माण होतात हे लक्षात घ्यायला हवे. आपल्या गायनपद्धतीच्या बाह्यरेषा जितक्या कठोर होतील तितका त्या गायकीस एकांगीपणा येईल हे प्रत्येकानेच लक्षात घ्यायला हवे. या कठोरपणाचाच जर मानबिंदू म्हणून उपयोग केला जाऊ लागला तर ही एक घातक फसवणूकच होते असे म्हटले पाहिजे. काही सन्माननीय अपवाद वगळता जयपूरने या बाबतीत खबरदारी घेतलेली नाही असेच म्हटले पाहिजे. परिणामतः महाराष्ट्राच्या अभिरुचीवर एका व्याजमूल्याचा खोल संस्कार झाला आहे. ग्वाल्हेर, आग्रा वा काही प्रमाणात किराणाही जयपूरपेक्षा अधिक लवचिक व समावेशक आहेत.

---